# सेवा करारनामा

आज दिनांक.    /    /२०२४ रोजी खालील प्रमाणे करार केला.

**मा. शिक्षणाधिकारी (प्राथमिक),**
**जिल्हा परिषद अमरावती**

**या करारासाठी पक्ष क्रमांक १**

...आणि...

करार पेसा क्षेत्रातील भरती प्रक्रियेकरिता अनुसूचित जमाती व इतर प्रवर्गातील शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता धारण करणाऱ्या उमेदवाराचे नाव श्री. / श्रीम. ..................................................................वय..........वर्ष
पत्ता...........................................................................................................................

**या करारासाठी पक्ष क्रमांक २**

सदर सेवा कराराचे नियमन करणाऱ्या अटी/शर्ती खालीलप्रमाणे असतील.

१. करार पेसा क्षेत्रातील भरती प्रक्रियेकरिता अनुसूचित जमाती व इतर प्रवर्गातील शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता धारण करणाऱ्या उमेदवाराचे नाव ..................................................................पक्ष क्र.२ यांची नियुक्ती नियमित शिक्षक उपलब्ध होईपर्यंत असेल. त्यानुसार त्यांचा कामाचा कालावधी असेल अथवा शासनामार्फत निर्गमित होणाऱ्या सूचनांच्या अधीन राहून करण्यात येत आहे.
२. सहशिक्षक / पदवीधर शिक्षक म्हणून असणारी विहित कामे करणे हे पक्ष क्र.२ ला बंधनकारक राहतील.
३. सदर काम हे कार्यालयीन वेळेत व कार्यालयीन कामाचे दिवशी अथवा आवश्यकतेनुसार सुटीच्या दिवशी सुद्धा पूर्ण करावी लागेल व यास पक्ष क्र.२ यांची मान्यता राहील.
४. सदर कामासाठी पक्ष क्र.१ हे पक्ष क्र.२ यांना प्रतिमास रु.२०,०००/- (वीस हजार मात्र) इतके मानधन अदा करेल व सदर सेवा कराराचे कालावधीत मानधनात बदल होणार नाही.
५. सदर सेवा करार पक्ष क्र.२ एक महिन्याच्या पूर्व सूचनेने समाप्त करता येईल. एक महिन्याची पूर्व सूचना न दिल्यास एक महिन्याचा पगार जमा करावा लागेल हि अट पक्ष क्र. २ ला मान्य आहे.
६. पक्ष क्र. २ हे पक्ष क्र. १ यांचे कार्यालयात प्राधिकृत केलेले अधिकारी यांचे नियंत्रणाखाली स्वतःच्या जवाबदारीवर काम करेल व कराराचे कालावधीत कोणत्याही तऱ्हेच्या अनपेक्षित कारणामुळे अथवा झालेल्या अपघातामुळे त्यास कोणत्याही प्रकारची शारीरिक व मानसीक इजा झाल्यास त्यासाठी पक्ष क्र. १ कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही.
७. पक्ष क्र. २ कार्यालयामध्ये काम करण्यासाठी वक्तशीरपणे व नियमित उपस्थित राहील, तसेच पक्ष क्र. २ ची कार्यालयातील वर्तणूक व कामाची गुणवत्ता उच्च दर्जाची राहील व त्याचे उत्तरदायित्व पक्ष क्र. १ च्या सर्व हितसंबंधाची रक्षा करणेचे राहील.
८. पक्ष क्र. १ यांनी वेळोवेळी निर्गमित केलेले नियम व सूचना पक्ष क्र. २ वार बंधनकारक राहतील व त्याचप्रमाणेविहित केलेल्या गुणवत्तेनुसार पक्ष क्र. २ कडून काम न झाल्यास पक्ष क्र. १ चे निर्देशनास आल्यास सदर सेवा करार तात्काळ रद्द करण्याचे अधिकार पक्ष क्र. १ कडे राहतील .

Scanned with OKEN Scanner

९. पक्ष क्र. २ या सेवा कराराचे कालावधीत अन्ये ठिकाणी कोणतेही काम स्वीकारण्यास मनाई राहील.

१०. पक्ष क्र. २ यांच्यावर कोणत्याही प्रकारचा गुन्हा व आरोपपत्र नसल्याचे प्रमाणपत्र स्वतंत्र सादर करावे लागेल.

११. या सेवा करारपत्राचे कोणत्याही कलमाबाबत वा अन्य कोणत्याही नियमाबाबत विवाद निर्माण झाल्यास पक्ष क्र. १ चा निर्णय अंतिम राहील व त्याबाबत कोणत्याही तर्हेची तक्रार / सूचनेची दखल घेतली जाणार नाही.

१२. पक्ष क्र. २ यांची नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपाची कंत्राटी पद्धतीने असल्यास भविष्यात पूर्णनियुक्ती अथवा पदस्थापन कामी किंवा वरिष्ठ प्राधिकरणाकडे तसेच न्यायालयाकडे दाद मागण्याचा अधिकार पक्ष क्र. २ यास राहणार नाही.

१३. पक्ष क्र. २ यांना जिल्हा परिषद यंत्रणेकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचना व आदेश बंधनकारक राहतील.

१४. पक्ष क्र. २ यांनी १ ते १३ पैकी कोणत्याही अटी / शर्तीचा भंग केल्यास कोणताही पूर्वसूचना न देता आदेश रद्द करण्याचे अधिकार पक्ष क्र. १ यांना राहतील.

१५. पक्ष क्र.२ यांना तात्पुरत्या स्वरुपाची कंत्राटी पद्धतीने देण्यात आलेली नियुक्ती ही शैक्षणिक वर्षाकरिता असेल.

**दिनांक:-    /    /२०२४**

**( उमेदवाराचे नाव नाव स्वाक्षरी)**
**पक्ष क्र. २**

(नाव............................................................)
पक्ष क्र. १

साक्षीदार

१)............................................................
२)............................................................

Scanned with OKEN Scanner